## नि. दि. दा. क्रं. नं.६/२०१२ नि. नं. ८६ वरील आदेश

CNR: MHST14-000060-2012

अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. वादी व प्रतिवादी तर्फे विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

२. वादीने प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी क्रं.१ याचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब मार्फ होवून मिळावा म्हणून दाखल केलेला आहे. वादीचे अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, प्रतिवादी क्रं.१ शशिकांत नामदेव शिंदे, यांचा दि.०९/०८/२०१७ रोजी आकस्मिक मृत्यू झालेला आहे. प्रतिवादीचे कायदेशीर वारस अभिलेखावर घेणे न्यायाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. तथापि, मयत प्रतिवादीचा मृत्यूचा दाखला हा दि.०६/०९/२०१७ रोजी वादीस प्राप्त झाल्याने तसेच मयत प्रतिवादी हा वादीचा सख्खा भाऊ असल्याने व त्याच्या आकस्मिक मृत्यूमुळे वादीची मनस्थिती ठिक नसल्याने मयत प्रतिवादीचे वारस अभिलेखावर घेण्यास ७ दिवसाचा विलंब झालेला आहे, तरी न्यायाच्या दृष्टीने सदरचा विलंब माफ करण्यात यावा, ही विनंती.

३. प्रतिवादी क्रं.१ यांच्या वारसांतर्फे प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल करुन, अर्जातील कथने नाकारलेली आहेत. वादीने विहीत मुदतीमध्ये अर्ज करुन, दाव्याच्या कामी मयत प्रतिवादी क्रं.१ च्या वारसांना समाविष्ट करणे आवश्यक होते. तथापि, वादीने तसे न केल्यामुळे प्रतिवादी क्रं.१ विरुध्द दावा अबेट झाला असल्याने अर्ज नामंजूर करण्यात यावा, अशी विनंती केली.

४. अर्ज व अर्जासोबत दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, वादीस मयत प्रतिवादी क्रं.१ याचे वारस अभिलेखावर घेण्यास ७ दिवसाचा विलंब झालेला आहे. अर्जातील कथनांचा विचार करता, झालेला विलंब हा शुल्लक असून, तो वादीच्या निष्काळजीपणामुळे झाला नसल्याचे दिसून येते. प्रस्तुतचा दावा हा वादीने दि.१३/०२/२००८ रोजी मयत प्रतिवादी क्रं.१ यांनी दावा मिळकती संदर्भात करुन दिलेल्या खरेदीपत्रासंदर्भात जाहीर ठरावाकरीता केलेला आहे. दाव्याचे स्वरुप पाहता मयत प्रतिवादीचे वारस अभिलेखावर येणे आवश्यक आहे. अर्जातील कारणांचा विचार करता, अर्ज मंजूर करुन झालेला विलंब माफ करणे न्यायाच्या दृष्टीने मला उचित वाटते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

### आदेश

१) अर्ज नि.८६ मंजूर करण्यात येतो.

२) वादीस मयत प्रतिवादी क्रं.१ याचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो.

३) खर्चाबाबत आदेश नाही.

फलटण.
ता.०४/१०/२०१८.

(व्ही. जे. जाधव)
३ रे सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर फलटण.